# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर

न्याय सेवा सदन, जिल्हा न्यायालय, चंद्रपूर

ई–मेल आयडी – chand-dlsa.mh@bhc.gov.in

दूरध्वनी कं._07172–271679, भ्रमणध्वनी क. 8591903934

जाहिरात दिनांक:– ०७ एप्रिल, २०२६

अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख २९ एप्रिल, २०२६, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.

## कंत्राटी वाहन चालक (Driver)

चंद्रपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करीता खालील पद निवड तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने करीता भरावयाचे आहे.

## पदाचे नाव व पात्रता

| अ. क्रं. | पदाचे नाव | संख्या | शैक्षणिक पात्रता (कमीत कमी) | एकत्रीत वेतन (सर्व भत्ते मिळून दरमहा) |
|---|---|---|---|---|
| १. | वाहन चालक (Driver) | १ | १. उमेदवार कमीत कमी एस.एस.सी (दहावी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>२. उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.<br>३. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास व त्यानंतर मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र. ५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसन्स) असावा.<br>४. उमेदवारास किमान ३ वर्ष हलके मोटार वाहन चालवण्याचा अनुभव असावा.<br>५. उमेदवाराचा वाहन चालविण्याचा पूर्व कार्यकाल (रेकॉर्ड) स्वच्छ असावा.<br>६. उमेदवारास मोटार वाहनाची देखभाल व सर्वसाधारण दुरूस्तीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>७. उमेदवार शारीरिकदृष्टया सुदृढ आणि निर्व्यसनी असावा. | किमान वेतन कायद्यानुसार |

...२...

# अटी व शर्ती

१. सदरचे पद ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचे असून फक्त ११ महिने या कालावधीसाठी कंत्राटी स्वरूपात भरण्यात येणार आहे. उमेदवाराचा या पदावर नौकरी कायम करणेबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

२. या सोबत अर्जाचा नमूना दिलेला असून त्या पध्दतीचा अर्ज अर्जदाराने बुधवार दिनांक २९/०४/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत प्रत्यक्ष अथवा नोंदणीकृत डाकेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर या कार्यालयाचे पुढील पत्यावर पोहचतील अशाप्रकारे दाखल करावा. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

**अर्ज दाखल करण्याचा पत्ता :—**

**मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,**

**न्याय सेवा सदन इमारत, जिल्हा न्यायालय, चंद्रपूर — पिन क्रं. ४४२ ४०१.**

३. अर्जावर/पोष्टाच्या लिफाफयावर कोणत्या पदाकरीता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमूद करावे तसे नसल्यास अर्ज अपूर्ण समजून त्याचा विचार केला जाणार नाही.

४. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेबाबत स्वयंसाक्षांकित प्रती दाखल करावेत.

५. **अर्जदाराचे वय जाहिरात प्रसिध्द झाल्या तारखेपावेतो २१ पेक्षा कमी आणि ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

६. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाकडे करारनामा लिहून दयावयाचा आहे.

७. नेमणूकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतेही पूर्व सुचना न देता नौकरीतून कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील.

८. उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपूर्वी नौकरी सोडावयाची असल्यास दोन महिन्याचे आगाऊ सूचना किंवा एक महिन्याचा ढोबळ/स्थूल पगार या प्राधिकरणाकडे जमा करावा लागेल.

९. भरती प्रक्रियेच्या माहिती करीता अर्जदाराने जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांच्या अधिकृत संकेतस्थळ **https://chandrapur.dcourts.gov.in/notice-category/recruitments/** यास भेट दयावी.

१०. पात्र उमेदवारांची यादी सोमवार दिनांक ०४/०५/२०२६ रोजी जिल्हा न्यायालय, चंद्रपूर या अधिकृत संकेतस्थळ **https://chandrapur.dcourts.gov.in/notice-category/recruitments/** यावर प्रसिध्द करण्यात येईल.

११. **पात्र उमेदवारांची मोटार वाहन परीक्षा (प्रादेशिक परिवहन कार्यालय अधिकाऱ्यांमार्फत) तारिख निच्छीत झाल्यानंतर घेण्यात येईल व त्याबाबत अधिकृत संकेतस्थळावर कळविण्यात येईल.**

१२. मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीची तारीख अधिकृत संकेतस्थळ **https://chandrapur.dcourts.gov.in/notice-category/recruitments/** नंतर कळविण्यात येईल.

07/04/26

स्थळ :— चंद्रपूर
दिनांक :— 07 /०४/२०२६

(सुधीर एस. इंगळे)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
चंद्रपूर

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर

## अंतर्गत

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर करीता निवळ तातपुरत्या स्वरूपात ११ महिने या कालावधीकरीता वाहन चालक कंत्राटी तत्वावर वाहनचालक (Driver) या पदासाठी अर्ज करण्याचा नमूना.

१. अर्जदाराचे संपुर्ण नांव व पत्ता :—

२. जन्म तारीख :—

३. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय :—

४. आधारकार्ड क्रमांक :—

५. मोबाईल क्रमांक व ई—मेल आयडी :—

६. मोटार वाहन चालविण्याचा परवाना क्र. :—
(ड्रायव्हींग लायसन्स)

७. परवान्याच्या वैधतेची तारीख :—

८. शैक्षणिक अर्हता :—

| अ. क्रं. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण वर्षे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. अनुभव :—

| अ. क्रं. | कार्यालय | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

१०.सोबत कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी

# <u>घोषणापत्र</u>

मी याप्रमाणें घोषित करतो, की या अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार व विश्वासानुसार खरी, पूर्ण व अचूक आहे. जर कोणतीही माहिती कोणत्याही टप्प्यावर खोटी किंवा चुकीची आढळल्यास माझी नियुक्ती/निवड रद्द करण्यात येऊ शकते. मी हे ही घोषित करतो की, माझ्यावर कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकरणाकडे कोणतीही शिस्तभंगाची कारवाई झालेली नाही. मी प्रामाणिकपणे, निष्ठेने व शिस्तबद्धपणे काम करण्याचे आश्वासन देतो.

ठिकाण :—
दिनांक :— /०४/२०२६ अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# <u>हमीपत्र</u>

मी, श्री. ________________________________ , वाहन चालक (Driver) पदासाठी अर्जदार, खालीलप्रमाणे विधिवत हमी देतो की,

१. माझ्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात कोणताही फौजदारी गुन्हा प्रलंबित नाही. तसेच मला कोणत्याही फौजदारी गुन्ह्यात दोषी ठरविण्यात आलेले नाही.

२. मी माझे वाहन चालविताना सर्व वाहतूक नियमांचे पालन करीन आणि सुरक्षित, जबाबदारीने वाहन चालवीन.

३. मी माझ्या वरिष्ठांच्या आदेशांचे पालन करीन आणि मला सोपविलेल्या कामांची प्रामाणिकपणे व वेळेत पूर्तता करीन.

४. मी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, मद्यपान करून वाहन चालविणे किंवा शासकीय नियमांचे उल्लंघन करणार नाही.

५. मला दिलेल्या वाहनाची योग्य काळजी घेईन व त्याची नियमित देखभाल करीन.

ठिकाण :—
दिनांक :— /०४/२०२६ अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी